**ठळक बातम्या**

- गुंतवणूकदारांना आपत्कालीन परिस्थितीत शंभर टक्के रक्कम परत करण्याचे रिझर्व्ह बँकेचे बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांना निर्देश

- प्रसारण सेवा नियमन विधेयकाच्या मसुद्यावर अभिप्राय आणि सूचना देण्याच्या मुदतीत १५ ऑक्टोबरपर्यंत वाढ

- कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयातल्या महिला निवासी डॉक्टर अत्याचार आणि हत्या प्रकरणी निवासी डॉक्टरांचा देशव्यापी संप

- विदर्भ आणि मराठवाड्यातल्या दुग्ध विकासाला गती देण्यासाठी १४९ कोटी रुपयांचं अर्थसहाय्य देण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**आणि**

- आयआरसीटीसी आणि एनएसआरटीसी यांचा ‘एक भारत एक तिकीट उपक्रम’ सुरू

**<><><><><>**

बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांनी आपल्या ठेवीदारांना आपत्कालीन परिस्थितीत गुंतवणुकीच्या पहिल्या ३ महिन्यांमध्ये ठेवीची १०० टक्के रक्कम परत करावी असे निर्देश भारतीय रिझर्व बँकेनं दिले आहेत. मुदतपूर्व काढल्या गेलेल्या अशा ठेवींवर व्याज दिलं जाणार नाही, असं रिझर्व्ह बँकेनं काल जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

गुंतवणूकदारांना अन्य कोणत्याही कारणासाठी मुदतपूर्व गुंतवणूक मोडायची असेल, तर मूळ गुंतवणुकीच्या ५० टक्के, अथवा ५ लाख रुपये, यापैकी जी कमी असेल, तेवढी रक्कम काढता येईल, मात्र त्यावर व्याज मिळणार नाही. तसंच बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांनी ठेवींची मुदत संपण्यापूर्वी १४ दिवस ठेवीदारांना त्याबाबतची आगाऊ सूचना द्यावी, असं यात म्हटलं आहे.

गृहकर्ज देणाऱ्या कंपन्या आणि बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांच्या नियमांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी, गृहकर्ज देणाऱ्या कंपन्यांनी सार्वजनिक ठेवींच्या १५ टक्के मर्यादेपर्यंत तरल मालमत्ता राखणं गरजेचं असल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. सध्या ही मर्यादा १३ टक्के इतकी आहे. या कंपन्यांनी वर्षातून एकदा क्रेडिट रेटिंग एजन्सींकडून, 'इन्व्हेस्टमेंट ग्रेड' रेटिंग मिळवणं आवश्यक असल्याचं यात म्हटलं आहे. हे बदल १ जानेवारी २०२५ पासून लागू होणार असल्याचं या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं प्रसारण सेवा नियमन विधेयक २०२४ च्या मसुद्यावर अभिप्राय आणि सूचना देण्याची मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत वाढवली आहे, यावर विचारविनिमय करून कायद्याचा नवा मसुदा तयार केला जाईल, असं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं म्हटलं आहे. विधेयकाच्या मसुद्यावर विविध संघटनांकडून अनेक शिफारशी, अभिप्राय आणि सूचना प्राप्त झाल्या आहेत, असही मंत्रालयानं म्हटलं आहे. यापूर्वी, या विधेयकाचा मसुदा भागधारक आणि सर्वसामान्यांच्या सूचनांसाठी गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये सार्वजनिक करण्यात आला होता.

**<><><><><>**

खासगी दूरचित्रवाणी वाहिन्यांनी आपत्ती किंवा दुर्घटनांची दृश्यं दाखवताना त्यावर घटना घडलेल्या तारखेचा उल्लेख करावा अशी मार्गदर्शक सूचना माहिती

आणि प्रसारण मंत्रालयानं जारी केल्या आहेत. नैसर्गिक आपत्ती किंवा दुर्घटना घडल्यानंतर वाहिन्यांवर अनेक दिवस बातम्या प्रसारित केल्या जातात, मात्र त्यात घटना झालेल्या दिवसाचीच दृश्यं दाखवली जातात. त्यामुळे प्रेक्षकांमध्ये विनाकारण गोंधळ निर्माण होतो आणि भिती पसरते, असं यात म्हटलं आहे. प्रेक्षकांमध्ये गैरसमज पसरू नये यासाठी संबंधित दृश्यं दाखवताना मूळ घटनेची तारीख आणि वेळ ठळकपणे दाखवावी, असं या **मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात** आलं आहे.

**<><><><><>**

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात महिला निवासी डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि हत्या प्रकरणाचा निषेध नोंदवण्यासाठी देशभरातल्या निवासी डॉक्टरांनी संप पुकारला आहे. फोर्डा या निवासी डॉक्टर संघटनेच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे.

राज्यात विविध सार्वजनिक रुग्णालयांतल्या निवासी डॉक्टरांनी आज काम बंद आंदोलन सुरू केलं. मुंबईत मार्डच्यावतीने सकाळी साडेदहा वाजल्यापासून केईएम, नायर, सायन कुपर या रुग्णालयांमध्ये आंदोलन सुरू करण्यात आलं आहे. डॉक्टर हत्याप्रकरणी न्याय मिळावा, केंद्रीय तपास यंत्रणे मार्फत चौकशी व्हावी, आदी मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत. सुमारे साडे तीन हजार निवासी निवासी डॉक्टरांनी या आंदोलनात सहभाग घेतला आहे

झारखंडमधल्या राजेंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस मधल्या कनिष्ठ डॉक्टरांनीही या घटनेच्या निषेधार्थ बेमुदत संप पुकारला आहे. आपत्कालीन परिस्थिती वगळता आरोग्य सेवेवर परिणाम झाल्यानं रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणी सीबीआय चौकशी करण्याची आणि कामाच्या ठिकाणी डॉक्टरांच्या सुरक्षेची मागणी आंदोलकांनी केली आहे.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड  यांनी नवी दिल्लीतल्या भारत मंडमप इथं घरोघरी तिरंगा बाईक रॅलीला आज सकाळी हिरवा झेंडा दाखवला. घरोघरी तिरंगा ही एक चळवळ झाली असून देशातले कोट्यवधी लोक आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावत आहेत, असं उपराष्ट्रपती म्हणाले. घरोघरी तिरंगा या मोहिमेतून स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि विकसित भारताबद्दलची देशाची वचनबद्धता दिसते, असंही त्यांनी सांगितलं.  **केंद्रीय गृहमंत्री** अमित शाह आज अहमदाबाद इथं तिरंगा यात्रेला सुरुवात करतील. गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्र यादव हेही या यात्रेत सहभागी होणार आहेत. घरोघरी तिरंगा अभियाना अंतर्गत पूर्व अहमदाबादच्या  विराट नगर इथून ही यात्रा सुरू होणार आहे.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंगा ध्वजाचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी अभिनेते सुबोध भावे  म्हणाले…

**होल्ड--बाईट - सुबोध भावे**

**<><><><><>**

विदर्भ आणि मराठवाड्यातल्या दुग्ध विकासाला गती देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज ही बैठक झाली. यासाठी १४९ कोटी रुपयांना देखील यावेळी मान्यता देण्यात आली. मराठवाड्यातल्या खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम आणि देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा, यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट मार्च २०२५ पर्यंत शिथील करण्याचा, तसंच

नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्ष करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

**<><><><><>**

आयआरसीटीसी म्हणजे भारतीय रेल्वे खाद्य आणि पर्यटन महामंडळ आणि एनएसआरटीसी म्हणजे राष्ट्रीय राजधानी प्रदेश वाहतूक महामंडळ यांनी एकत्रित येऊन एक भारत एक तिकीट उपक्रम सुरू केला आहे. या अंतर्गत भारतीय रेल्वे आणि नमो भारत रेल्वेंची तिकीटं बुक करता येणार आहेत. आयआरसीटीसी संकेतस्थळावरून नमो भारत तिकीटं बुक करण्याची मुभा मिळणार असून, ती रद्द करणं आणि पैसे भरणं यांच्यासाठी अनेक पर्याय देण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

मच्छिमारांचा व्यवसाय वाढावा आणि त्यांना सुरक्षितता मिळावी, यासाठी केंद्रसरकार खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या १ लाख जहाजांवर ट्रान्सपॉन्डर्स बसवणार आहे. मत्स्यव्यवसाय क्षेत्रात अंतराळ तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर नवी दिल्लीमध्ये आयोजित राष्ट्रीय परिषदेत केंद्रीय मत्स्यव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी आज ही माहिती दिली. मासेमारी जहाजाने सागरी हद्द ओलांडल्यावर देखील हे ट्रान्सपॉन्डर्स अलर्ट जारी करतील, असं ते म्हणाले. देशाच्या अर्थव्यवस्थेत मत्स्यव्यवसायाचं मोठं योगदान असून, मत्स्यव्यवसाय व्यवस्थापनात आणि विकासात अंतराळ तंत्रज्ञान महत्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिनसाठी रोख रक्कम देणारं मध्यप्रदेश हे देशातलं पाहिलं राज्य ठरलं आहे. कर्नाटक, राजस्थान, आणि दिल्ली या राज्यांमध्ये विद्यार्थिनींना मोफत सॅनिटरी नॅपकिन्स दिली जातात, मात्र मध्यप्रदेशमध्ये स्वच्छता आणि आरोग्य योजने अंतर्गत ७ वी ते १२ वी च्या विद्यार्थिनींच्या

खात्यात थेट रक्कम जमा केली जाते. या योजने अंतर्गत आतापर्यंत सुमारे १९ लाख विद्यार्थिनींना ५७ कोटी १८ लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम हस्तांतरित केल्याचं मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियामध्ये कॅनबेरा इथं आज भारत-ऑस्ट्रेलिया सागरी सुरक्षा संवाद आयोजित करण्यात आला होता. सर्वसमावेशक विकास आणि जागतिक कल्याणासाठी सागरी क्षेत्रात सुरक्षित वातावरण कायम ठेवण्याच्या विविध मार्गांवर यावेळी चर्चा झाली.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत देशाच्या मध्य, दक्षिण आणि ईशान्य भागात जोरदार पावसाची शक्यता असून हवामान विभागानं या ठिकाणी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. राजस्थान, उत्तरप्रदेश, पूर्व आणि ईशान्य भारतात तुरळक ठिकाणी पुढले ७ दिवस जोरदार पावसाची शक्यता असून पूर्व राजस्थानमध्ये अती जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**